# प्रकरण सहावे

## उपसंहार

आतापर्यंत आपण यशवंतांच्या काव्यलेखनाचा स्थूल परिचय करुन घेतला. त्यांच्या कवितेचे स्वरुपविशेषही विचारात घेतले. यशवंत हे रविकिरण मंडळातले कवी. त्यामुळे रविकिरणमंडळाच्या कवितेचा आणि मंडळातील कवीचांही विचार करावा लागला. पूर्वसंस्कार आणि रविकिरण मंडळातील संस्कार यातून त्यांची कविता घडली. कालाचीही काही प्रेरणा अथवा परिणाम असतोच त्याचाही परमार्श घेतला.

पहिल्या प्रकरणात रविकिरण मंडळ स्थापन होण्यापूर्वीची पार्श्वभूमी पाहिली. यशवंतांच्या काव्यलेखनाचा स्थूलपरिचय करुन घेतला. १९२०-२१च्या आसपास यशवंतांचे काव्यक्षेत्रात पदार्पण झाले. १९२३ नंतर रविकिरण मंडळात आल्यानंतर त्यांची कविता विशेष सामर्थ्याने प्रकट होऊ लागली. त्याआगोदर काव्यप्रांतातील स्थितीचे अवलोकन केले. १९२०च्या आगेमागेच गोविंदाग्रज, बालकवि, टिळक आदि मोठे कवी निधन पावले. त्यामुळे काव्यविश्वात पोकळी निर्माण झाली. तेवढी प्रसिध्दी असलेले व त्यांच्यासारखे उत्तुंगप्रतिभाशक्ती असलेले कवी तेव्हा नव्हते. काव्यविश्वात निर्माण झालेली पोकळी थोडीफार का होईना भरुन काढण्याची कामगिरी रविकिरणमंडळाने केली. या मंडळांच्या कवितेच्या मागील पार्श्वभूमिही बदत्या. सामाजिक, राजकीय परिस्थितीतून आलेली आहे. सामाजिक सुधारणा, शिक्षणाचा वाढता प्रसार यामुळे समाज जिवनही बदलले होते. आणि भारतीय राजकारणातून टिळकांचा अस्त झाला आणि गांधीचा उदय झाला. त्यामुळे जहाल मतवाद मागे पडून तिथे मवाळ मतवाद आला. सत्य व अहिंसा या तत्वांना महत्वाचे स्थान मिळाले. पहिल्या महायुध्दानेही एकूण जगावर जे काही परिणाम घडविले त्याचे ही पडसाद या कवितेत ऐकू येतात. माणूस ज्या मातीने घडतो त्या मातीचे रंग तो कधी हरवून बसत नाही. लहानपणी जे संस्कार होतात ते जन्मभर टिकतात त्यादृष्टीने यशवंतांची जडण घडण कशी होत गेली ते पाहिले. आणि पंडिती कवितेचे ठसे त्यांच्या कवितेवर प्रामुख्याने आणि ठळकपणे उठलेले आहेत. आईवडीलांनी घडविलेल्या संस्कारांची पार्श्वभूमी त्यांना लाभली. विद्यार्थी दशेपासून ते मृत्यूपर्यंत त्यांनी अखंड कवितालेखन केले. स्फुट कवितांचे संग्रह, खंडकाव्ये, व दीर्घ कविता इत्यादी मिळून त्यांचे एकोणीस काव्यग्रंथ झाले आहेत. या लिखीत कवितेद्वारे जसे ते लोकांपर्यंत पोहोचले तसे काव्यगायनाच्या माध्यमातून अधिक यशस्वीपणे पोहोचले. त्यामुळे त्यांना अफाट लोकप्रियताही मिळाली. रसिकांचे प्रेम मिळाले त्यांच्या काव्यसेवेमुळे त्यांना अनेक मानसन्मानही मिळाले. पण रसिकांच्या दुव्याशिवाय त्यांना दुसरी कोणतीही

कमाई मोठी वाटली नाही. खिन्नांच्या अंत:करणातल्या तारा झंकारण्यासाठी त्यांची कविता जन्माला आलेली दिसते. काव्यलेखना पाठीमागची प्रेरणा तर हीच आहे. कविता ही जीवनास प्रेरक व साह्यभूत व्हावी याच मताचे यशवंत आहेत. त्यांची काव्यलेखनामागची भूमिका, प्रदीर्घ काव्यसेवा आणि जनमान्यता यातून यशवंतांचे मोठेपण कळते. ते सामान्य दर्जाचे कवी नसावेत अशी खात्री पटते.

यशवंत हे रविकिरण मंडळाचेही सदस्य, काव्यविश्वातले तारे निखळून पडल्यामुळे जी एक पोकळी निर्माण झाली होती. ती भरुन काढण्याची कामगिरी रविकिरण मंडळाने केली. श्री. बा. रानडे, मनोरमाबाई रानडे, ग.त्र्यं. माडखोलकर, वि.दं. घाटे. द.ल. गोखले, माधव ज्यूलियन, गिरीश आणि यशवंत हे रविकिरण मंडळाचे कविसदस्य. सुरुवातीला कवी अनंत तनयांच्या श्री महाराष्ट्र शारदा मंदिरात असणारी ही मंडळी शारदा मंदिरातल्या जुन्या मताच्या लोकांशी मतभेद होऊन शारदा मंदिरातून बाहेर पडली व चहाच्या निमित्ताने दर रविवारी गिरीश व रानडे यांच्या घरी जमू लागली. यातूनच 'रविकिरण मंडळ' उदयाला आले. सुरुवातीला सामुहिकरित्या साहित्यनिर्मिती केली. किरण, शलाका, उषा, प्रभा ही सूर्याच्या प्रकाशाची नावे असणारी पुस्तके मंडळाच्या नावावर काढली नंतर स्वतंत्रपणे पुस्तक प्रसिध्द करणं सुरु केलं. आणि त्याबरोबरच काव्यगायनाचे कार्यक्रम करुन कवितेला लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. यशवंत आणि गिरीश यांनीतर मानधनाच्या अपेक्षेशिवाय स्वखर्चाने काव्यगायनाचे कार्यक्रम केले.

या मंडळातील माधव ज्यूलियन, गिरीश आणि यशवंत हे तिघेच महत्वाचे कवी. कारण बाकीच्या कविसदस्यांची सेवा संस्थेच्या दृष्टीनेही फार अल्पशी आहे. रविकिरण मंडळाची स्थापना झाल्यावर चारच वर्षात मनोरमा रानडे यांचे निधन झाले. त्यांनतर श्री.बा. रानड्यांच्या काव्यलेखनाचाही ओघ खंडित झाला तोपर्यंतची त्यांची काव्यारचनांही अल्पच होती. माडखोलकर गद्य वाङ्मयाकडे वळले. द.ल. गोखले, आणि घाटे यांनीही पुन्हा काव्यनिर्मितीकडे पाहीले नाही. त्यामुळे त्यांच्या कवितेचे विशेषही विशेष असे उमटले नाहीत.

या तिघांपैकी माधव ज्यूलियन हे फार्सीचे प्राध्यापक. फारसी कवितेचा त्यांनी अभ्यास केलेला.त्यामुळे फारसी कवितेतील गज्जल वृत्त त्यांनी मराठीत आणले. फारसी गज्जलांचे मराठीत भाषांतर केले. फारसी शब्दांची कवितेत पखकरण केली. ते कवी होते. तसेच विद्वानही होते. त्यांच्या 'छन्दोरचना' या ग्रंथाला मुंबई विद्यापिठाने 'डी लिट' ही पदवी दिली. मराठीत ही पदवी मिळविणारे माधवराव हे पहिले, कवितेच्या, छन्दाच्या बाबतीत व भाषेच्या बाबतीतही त्यांनी अनेक नवनवीन प्रयोग केले व स्वत:चे त्यावरील प्रभुत्व दाखविले. पण त्यामुळे

त्यांची कविता हास्यास्पद ठरु लागली. पण तरीही रविकिरण मंडळातील रवी होण्याचा मान त्यांना दिला जातो. गिरीश हे ही आपल्या काव्यकर्तृत्वाने आपला ठसा उमटविणारे रविकिरण मंडळातील एक कवी. त्यांचीही काव्यसेवा उल्लेखनिय आहे. त्यांचे लेखन उत्कट तळमळीतून निर्माण होण्यापेक्षा खोल सहानुभूतीतून निर्माण झाले आहे. तसेच त्यांच्या सामाजिक विषयावरील खंडकाव्यांनी आणि स्फूट कवितेने समाजाला शिक्षण देण्याचेही कार्य उत्तम प्रकारे केले आहे. खंडकाव्य हा काव्यप्रकार मराठीत रुढ होण्यास व लोकप्रिय होण्यास त्यांच्या खंडकाव्यांनी फार मोठी कामगिरी केली या दोघांपेक्षा यशवंतांनी अधिक दीर्घकाळ काव्यरचना केली. आणि विपुल केली कारण माधवरावांना फार अल्प आयुष्य मिळाले. १९३९ सालीच ते निवर्तले. गिरीश १९७४ ला गेले पण १९६८-६९ लाच त्यांचे कवितालेखन थांबले होते. आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्याला त्यांनी स्वत:ला वाहून घेतल्याने, सर्व कार्यशक्ती तिकडे गुंतल्याने आणि प्रतिक्षेचे तेवढे अलौकीक देणे न लाभल्याने त्यांची कविता विशेष सामर्थ्याने प्रकट झाली नाही. रविकिरण मंडळातील कवी म्हणून यशवंतांचा विचार करताना रविकिरण मंडळाच्या कवितेच्या विशेषांचा पडताळा घ्यावा लागतो. रविकिरणमंडळाने प्रेमविषयक नवीन अनुभूती आणली, संस्कृतमधील परस्वर्णांचा वापर केला नवनवीन वृत्ते निर्माण केली. आतापर्यंत उपेक्षित असलेल्या विषयांवर काव्यनिर्मिती केली. जनसामान्यांच्या भावनांना कवितेतून प्रकट केले. काव्यगायनाने कविता घरोघर पोहोचविली. व्यक्ति विकासाच्या आड समाज येतो म्हणून समाजाच्याविरोधी तक्रारीची भावना कवितेतून मांडली. यशवंतांच्या कवितेवर याचे परिणाम नाही म्हटले तरी झाले पण तरीही ते स्वत: चे स्वतंत्र व्यक्तिमत्व साकारत गेले. रविकिरण मंडळाचा त्यांच्यावर फारसा प्रभाव पडला नाही. मात्र रविकिरण मंडळात आल्यावर त्यांच्या कवितेला पैलू प्राप्त झाले. कारण ते पुण्याला येईपर्यंत नव्या कवितेशी त्यांचा परिचय नव्हता. विद्यार्थी असताना अभ्यासक्रमात जुनी पंडिती कविताच होती. त्यांचे काव्यक्षेत्रामागले पहिले गुरु साधुदास हेही पंडिती कवीच, रामदासांच्या कवितेचेही संस्कार त्यांच्यावर होतेच. पुण्यात आल्यावर नव्या कवितेशी परिचय झाला पण हे नवे विचार ते जुन्याच्या आधारानेच पचवू लागले. रविकिरण मंडळाचा आणखी एक विशेष म्हणने त्यांनी काव्यगायनाची प्रथा सुरु केली असे म्हणण्यापेक्षा दृढमूल केली. कारण त्यांच्या अगोदर, टेकाडे, सुमंत आदी काव्यगायन करीत. पण रविकिरण मंडळातील कवीमुळे काव्यगायनाची प्रथा खूप लोकप्रिय झाली. यशवंतांनीही भरपूर काव्यगायन केले. वयाच्या सत्तरीपर्यंत काव्यगायनासाठी त्यांना निमंत्रणे येत.

त्यांची कविता विपुल आहे. तशीच विविध स्वरुपाचीही आहे. सामाजिक, ऐतिहासिक, कौटुंबिक, प्रेमविषयक, अशा निराशावादीपणाचे सुर आळवणारी तसेच राष्ट्रप्रेमाचा झरा निर्माण करणारी अशी विविध

स्वरुपाची कविता त्यांनी लिहीली आहे. जानपद कवितांची निर्मिती त्यांनी केली आहे. केशवसुतांच्या कवितेतील जुन्याला जाळून टाकण्याचा उद्दाम आदेश त्यांच्या कवितेत नसला तरी समाजातील वाईट गोष्टींवर, दांभिकतेवर ते उपहासाचे तिव्र हत्यार घेऊन तुटून पडतात. सर्व वाईट गोष्टींचा निषेध करतात. मात्र केशवसुतांना नवसमाजाची निर्मिती अभिप्रेत होती तशी यशवंतांना नाही. महायुध्दाच्या विध्वंसक आशयाने ते व्यथित झालेले दिसतात. तसेच पूर्वजांच्या पराक्रम नवीन पिढीत राहिला नाही म्हणून ही व्यथित होतात. पारतंत्र्यांच्या पार्श्वभूमीवर पूर्वजांच्या पराक्रमाची आठवण नवीन पिढीला करुन देणे भाग होते. त्यांच्या ऐतिहासिक आणि राष्ट्रवादी कवितेपाठीमागची भूमिका हीच आहे. इंग्रजी सत्तेचा जुलमीपणा वर्णन करुन तरुणांतील देशभक्तीला त्यांनी आवाहन केले आहे. फाशीची शिक्षा हसत भोगणाऱ्या देशभक्तांची अढळ निष्ठा त्यासाठी वर्णिली आहे. संकुचिततेकडून विशालतेकडे जाण्यासाठी विविध प्रतिकांद्वारे हा आशय व्यक्त केला आहे. प्रेम हे मनाचे नाते असते. शरीराचे नव्हे. असा आशय त्यांनी आपल्या कवितातून व्यक्त केला आहे. शरीरावरील निष्ठा ढळू शकते प्रेमात निष्ठेला फार महत्व आणि म्हणून त्यांच्या कवितेतील प्रियकराला प्रेयसीच्या शरीर सौंदर्याचे आकर्षण कधी फारसे वाटले नाही. ती सुंदर असली तर त्याला आवडतेच पण त्यासोबतच तिच्यात मनाला मोहविणारे काही सद्गूण असतील तरच. प्रेम या संकल्पनेपेक्षा प्रेमावरच त्यांचे खरेखुरे प्रेम असलेले दिसते. त्यांची नायिकाही नायकाच्या सांपत्तीक वैभवाला न भुलता गुणसंपदेला भुलणारी अशीच आहे. आपल्या कौटुंबिक कवितातून त्यांनी वात्सल्यरसाचा परिपोष केला आहे. माता-पिता-पुत्र यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते त्यातून व्यक्त होते. आणि एकमेकांच्या अभावामुळे कसे दु:ख पदरी पडते तेही दाखविल आहे, त्या कवितातील 'आई ' ही कविता खूप गाजली. कवी यशवंत म्हणजे 'आई ' हे समीकरण दृढ झाले होते. त्यांच्या याच कवितेने त्यांना खूप लोकप्रियताही मिळवून दिली. जानपद गीतात त्यांनी फार मोलाची भर घातली आहे. भा.रा. तांबे यांच्या गुराख्याचे गाणे मध्ये जानपदगीताचा जन्म झाला त्यानंतर चंद्रशेखराचे 'काय हो चमत्कार' हे ही ग्रामीण आशयच प्रकट करणारे काव्य, यांच्यानंतर यशवंत, गिरीश यांनी जानपद जीवनावर काव्य निर्मिती केली. यशवंतांच्या जानपद गीतांतून त्यांची जानपद जीवनावरची निष्ठा दिसून येते. नाविन्याचे आकर्षण त्यापाठीमागे नव्हते. शेतकरी समाजाचे जीवन त्यांचे सुखदु:ख याचे चित्रण त्यांच्या या कवितेत येते.

आर्थिक ओढग्रस्त असफल संसार, समाजाची अपमानाची वागणूक इत्यादींमुळे त्यांच्या कवितेत निराशावादीपणा आढळतो. ही निराशा एवढी उत्कट रितीने व्यक्त होते की माधव मनोहरांनी त्यांना 'दु:खाचे शाहिर' म्हटले आहे. निराशेचेच दर्शन घडविणाऱ्या विपुल कविता त्यांनी जशा लिहील्या तशा, आशावादाच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

ध्येयवादाच्याही लिहील्या. या कविता म्हणजे निराशावादी सूर आळवणाऱ्या मनाची घातलेली समजूत असते. असे वाटते. पण यातून सुक्ष्माकडून स्थूलाकडे, विशालतेकडे जाण्याची प्रेरणा दिलेली आहे.

ज्या भूमित आपण जन्मलो तिचे आपल्यावर ऋण असतात. त्या ऋणातून मुक्त होण्यासाठी आपल्या जन्मभूमीसाठी आपण काही केले पाहिजे. ही राष्ट्रप्रेमाची भावना बऱ्याच कवितातून व्यक्त होतेच, पारतंत्र्याच्या वेळीही त्यांनी हीच भावना व्यक्त केली आहे. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही या भावनेची आवश्यकता असते. देशाचा विकास याच भावनेने होतो. म्हणूनच त्यांनी देशप्रेमाची प्रेरणा देणारी कविता लिहीली आहे.

याशिवाय छोट्या छोट्या साध्या विषयांवरही कविता लिहील्या आहेत, आशयापेक्षा रसज्ञता त्यातून प्रकट होते.

हे झाले त्यांच्या स्फुट कवितांच्या वैशिष्ट्यांचे स्थूल विवेचन. त्यांनी दिर्घकाव्य स्वरूप रचनाही केली आहे. तिच्यात प्रामुख्याने सुरूवातीच्या काळात जी तीन खंडकाव्ये लिहीली आहेत त्यांचा विचार प्रथम केला आहे. ती खंडकाव्ये म्हणजे जयमंगला, बंदिशाळा, व काव्यकिरिट, जयमंगला ही काश्मीरस्थ विल्हण कवीच्या 'चौरपंचारिका' काव्यावर आधारलेली प्रेमकहाणी आहे. कथेचे सूत्र तेवढे स्वीकारून यशवंतानी बाकीच्या तपशील गाळला आहे. व काव्यातील भावनात्मकतेला प्राधान्य देऊन हे खंडकाव्य लिहीले आहे. भावगीतांच्या मालिकेतून हे खंडकाव्य स्वीकारले आहे. हा अभिनव प्रयोग होता. त्याचे खूप कौतुक झाले. मूळ काव्यातील शृंगार रस परिप्लूतपपणा घालविणयासाठी, (कारण तो त्यांच्या प्रवृत्तीशी अजिबात जुळणारा नव्हता) यशवंतांनी या काव्यासाठी भावगीताश्रयीपणा स्वीकारला. पण हा प्रयोग खूपच यशस्वी झाला. व यशवंतांची भावगीतकवी म्हणून जी ख्याती होती ती अधिकच मान्यता पावली. 'बंदिशाळा' या खंडकाव्याधारे त्यांनी बंदिशाळेतील बालगुन्हेगारांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. त्यांनी बंदिशाळेत नोकरी केली त्यामुळे बालगुन्हेगारांच्या जीवनाचा त्यांना जवळून परिचय झाला. त्याचा हा परिपाक असला तरी सामाजिक खंडकाव्यांत एका नवीन विषयाची भर या खंडकाव्यामुळे पडली आहे. 'काव्यकिरिट' हे खंडकाव्य पूर्णपणे प्रासंगिक असले तरी चिरंतन अशा मूल्यांची शिकवण त्यातून दिलेली आहे. बडोदा नरेश सयाजीराव महाराज गायकवाड यांचे पुत्र प्रतापसिंह यांच्या राज्यारोहण प्रसंगावरचे हे काव्य आहे. राज्यारोहण सोहळा कवीने पाहिला नाही पण त्या सोहळ्याचे चित्रिकरण बघून, ऐकीव माहितीवरून काव्याची रचना केली आहे. पण काव्यात सोहळ्याचे वस्तुनिष्ठ वर्णन येते ते केवळ साधनरूपच. त्याशिवाय कविला काही वेगळे सांगायचे आहे हे काव्य वाचल्यावर कळते. वस्तुनिष्ठ

चित्रणात यशवंत रमत नाहीत ते प्रामुख्याने भावगीतकवी आहेत. त्यामुळे राजा व प्रजा यांच्या आत्मपर उद्‌गारांनाच संबध काव्यात महत्व मिळाले आहे. इतराच्या सांगण्यावरून काव्याची निर्मिती झाली आहे. त्यामुळे पोकळ स्तुतीप्रदर्शन वैगेरे येण्याचा संभव पण तो कवीने कुशलतेने टाळला आहे. त्यांच्या या काव्यावर 'भाट' गिरीचाही आरोप झाला. आधुनिक काळात स्फूर्तिवर अवलंबून असणाऱ्या कवींनी ठरवून काव्य लिहीणे दोषास्पदच ठरते. इतरांच्या सांगण्यावरून काव्याची निर्मीती केली हा यशवंतांचा दोष पण अशा काव्यातूनही जनहितदक्ष राहण्याचा राजाला उपदेश केला हा त्यांचा गुण.

या तीन खंडकाव्याबरोबरच त्यांनी दिर्घकाव्यरचना केली आहे. ती प्रामुख्याने उत्तरायुष्यात 'मुठे लोकमाते' हे पूर्णपणे प्रासंगिक, घडलेल्या घटनेचे वस्तुनिष्ठपणे दर्शन घडविणारे काव्य. जानशेतचे धरण फुटले, त्याचे परिणाम इत्यादी या काव्यात वर्णन केले आहे. 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य त्यांनी लिहीले आहे. शिवराय हे अखिल महाराष्ट्राचे प्रेरणास्थान त्याचे गौरवगान त्यांचे चरित्रवर्णन करून यशवंतांनी केले आहे. काव्याचा आकृत्तिबंध ही मोठा म्हणजे ५२१ पानांचा आहे. भावनात्मकते बरोबरच ऐतिहासिक सत्याचाही आधार घेतल्याने त्याची ऐतिहासिकता सुटली नाही. 'रणदुर्गा झाशीवाली' हे ही ऐतिहासिक काव्यच. नावातूनच हे राणी लक्ष्मीबाईचे अल्प चरित्र आहे हे जाणवते. या दोन्ही काव्यातून यशवंतांच्या इतिहासाबद्दलच्या प्रेमाची साक्ष पटते. खरे तर 'मराठ्याचे महाभारत' लिहीण्याचा त्यांचा संकल्प होता पण ते शक्य झाले नाही. 'छत्रपती शिवराय' मधून पहिला खंड लिहीण्याचा आनंद त्यांनी मिळविला पण पुढे लिहीणे शक्य झाले नाही. मग शेवटी 'रणदुर्गा झाशीवाली' हा शेवटचा खंड लिहून कर्तव्य पूर्तीचा आनंद अंशतः तरी मिळविला.

यशवंतांच्या भाषेची वैशिष्ट्ये पाचव्या प्रकरणात पाहिली आहेत. सुबोधता हे त्यांच्या भाषेचे प्रधान वैशिष्ट्य. त्यांची भाषा सर्वांना समजेल, पचेल, रूचेल अशी असे. त्याबरोबरच आपले सौंदर्य प्रकट करणारीही असे, याबाबतीत संसकृतप्राचुर्यना, हिंदी, फारसी भाषेतील शब्द, रामदासांच्या साहित्यातले काही विशिष्ट शब्द, ग्रामीण भाषेतील शब्द यांची योजना त्यांनी स्वीकारलेली दिसते. गेयता हाही त्यांच्या कवितेचा मुख्य गुण होय. काव्यगायनासाठी, तसेच वाचकालाही ती लयीत तालात म्हणता यावी ही योजना त्यापाठमागे आहे. गेयतेसाठी विविध जातीवृत्तांचा वापर, त्यांनी केला आहे. जुन्या परंपरेत वाढल्याने त्यांची सर्व कविता वृत्तबध्दच आहे. जुन्या नव्या सर्व धंदाचा वापर त्यांनी आपल्या कवितेत केला आहे. यमकाचा वापर तर भरमसाठ केला आहे. यमकाशिवाय त्यांची कविता सापडणे कठीण. अनुप्रास, श्लेष, उपमा, रूपक इत्यादी अलंकारांची योजना करून

कवितेचे सौंदर्य वाढविले आहे. पण सौंदर्य वाढविण्याच्या सोसापायी कवितेचे भावतत्व मारले गेलेले दिसत नाही. आणि अलंकारांच्या वापराचाही त्यांना फारसा हव्यास नाही. ते जुन्या परंपरेने वाढलेले असल्यामुळे पौराणिक कथांतले दाखले वारंवार त्यांच्या कवितातून येतात. रामायण, महाभारत, ईश्वराचे दहा अवतार, समुद्रमंथन इत्यादी संकल्पना त्यात येतात. यमकामुळे भिन्न प्रवृत्तीचे शब्द एकत्र वापरलेले दिसले तरी आशयाला कोणताही बाधा येत नाही.

शृंगार, वीर, करून आदि रसांचा परिपोषही त्यांच्या कवितांतून झालेला दिसतो. उपमेचेही त्यांच्या कवितेला वावडे नाही. उपमेतही विविधता असते.

सुरूवातीच्या कालखंडातील कवितेची भाषा आणि नंतरच्या कवितेची भाषा यात फारसा बदल झालेला दिसत नाही.

आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांनी काव्यदेवतेची आराधना केली. 'कमण्डलू' हा शेवटचा कवितासंग्रह, त्यानंतर संग्रहारूपाने कविता प्रसिध्द झाली नाही. वृत्तपत्रातून मात्र कवितालेखन चालूच होते. अशा एक दोन कविता नमुन्यादाखल परिशिष्टात समाविष्ट केल्या आहेत. तसेच ते महाराष्ट्रकवी झाल्यानंतर येणाऱ्या अभिनंदनपर पत्रांना, उत्तरे देण्यासाठी त्यांनी 'सुहृदयांनो' ही कविता एका कार्डवर छापून ती कार्डे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पाठविली. ती कविताही हस्तलिखित स्वरूपात दिली आहे.

सारांश 'महाराष्ट्र कवी यशवंतांची कविता, तिचे स्वरूप आणि विशेष' हे पाहण्याचा प्रस्तुत लघुशोधनिबंधात केला आहे. यशवंतांच्या कवितेत प्रस्तुत झालेली जीवनमूल्ये, आजही गरजेची आहेत असे वाटते. त्यांच्या कवितेतून प्रकट झालेल्या इतर गोष्टींचीही आज उणिव भासते. त्यामुळे प्रस्तुत शोध प्रवास करताना मनाला काही गवसल्याचा आनंद मिळत होता. एकूण या अभ्यासाने मनाला प्रसन्नता मिळाली.

## परिशिष्ट पहिले

### जीवनपट

| | | | |
|---|---|---|---|
| ९मार्च | १८९९ | - | तारळे येथे जन्म (मुळ गाव चाफळ) |
| | १९१७ | - | सांगली हायस्कूलमधून डिपार्टमेंटल स्कूल फायनल परिक्षा पास. |
| | १९१८ | - | च्या नवरात्रात आईचे निधन. |
| | १९१९ | - | पुण्याला नोकरी निमित्ताने आगमन. याचसाली 'नवयुग' मासिकात पहिली कविता 'तारकानाथ' या टोपण नावाने प्रसिध्द. |
| | १९१९ | - | 'मित्रप्रेमरहस्य' हे मित्रनिधनावरील बत्तीस पानी काव्य लिहीले. नंतर 'लोकसंग्रह' या दैनिकात कवितालेखन दासानुदास आणि नंतर तारकानाथ या टोपण नावाने. |
| | १९२० | - | च्या ऑक्टोबर महिन्यात 'महाराष्ट्र शारदा मंदिरा'ची स्थपना झाली त्यात अनंत तनयांकरवी प्रवेश झाला. |
| | १९२० | - | 'तुटलेला तारा' हे टिळक निधनावरील काव्य. |
| | १९२१ | - | साली न.चिं. केळकरांच्या अध्क्षतेखाली झालेल्या बडोदे येथील साहित्य संमेलनाच्यावेळी कविता म्हणून दाखविण्याची संधी मिळाली त्यावेळी 'स्वातंत्र्यलक्ष्मीस मुजरा' आणि 'देहाचा पूल' या कविता विशेष गाजल्या. तेथून कवी यशवंत महाराष्ट्राला विशेष परिचित झाले. |
| | १९२१ | - | ला कोल्हापूर येथे भरलेल्या पहिल्या महाराष्ट्र कवीसंमेलनात त्यांनी 'देहाचा पूल' ही कविता गाऊन श्रोत्यांची मने जिंकली या त्यांच्या कवितागायनास त्यावेळी रौप्यपदक मिळाले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | १९२१ | - | 'यशवन्ती' हा काव्यसंग्रह. |
| २२ जाने. | १९२२ | - | 'आई' ही प्रसिध्द कविता लिहीली. |
| ९ सप्टेंबर | १९२३ | - | रविकिरण मंडळाची स्थापना झाली. त्यानंतर या मंडळाची अनुक्रमे किरण, काव्यविचार, उषा, शलाका आणि प्रभा ही पुस्तके निघाली त्यात कविता व लेख. |
| | १९२९ | - | 'यशोधन' हा काव्यसंग्रह या काव्यसंग्रहाला सर्वात जास्त लोकप्रियता मिळाली. या काव्यसंग्रहाची पहिली एकहजार प्रतींची आवृत्ती पहिल्या नऊ महिन्यांत संपली आणि तिच्या एकामागून एक अशा पाच आवृत्त्या निघाल्या. |
| | १९३० | - | 'भावमंथन' हा काव्य संग्रह. |
| | १९२३ ते १९३० | - | पर्यंत येरवड्याच्या रिफर्मेटरी स्कूलमध्ये नोकरी. |
| | १९३१ | - | 'जयमंगला' हे खंडकाव्य. |
| | १९३२ | - | 'बंदिशाळा' हे खंडकाव्य. |
| | १९३४ | - | च्या दरम्यान नीराताईशी द्वितीय विवाह हा आंतरजातीय विवाह असल्याने त्याची त्यावेळी ''यशवंन्ती विवाह'' म्हणून संभावना झाली. |
| | १९३५ | - | 'यशोगंध' हा कवितासंग्रह. |
| | १९४० | - | बडोदे संस्थाने राजकवी. |
| | १९४० | - | ''काव्यकिरिट'' हे खंडकाव्य संस्थानातर्फे च प्रकाशित झाले. |
| | १९४१ | - | 'यशोनिधी' हा काव्यसंग्रह. |

| | | |
|---|---|---|
| १९४४ | - | 'यशोगिरी' हा काव्यसंग्रह. |
| १९४६ | - | 'ओजस्विनी' हा काव्यसंग्रह. |
| १९५१ | - | 'पाणपोई' हा निवडक कवितांचा संग्रह. |
| १९५० | - | मुंबईस झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. |
| १९५६ | - | 'वाकळ' हा कवितासंग्रह. |
| १९५९ | - | 'पर्वकाल ये नवा' हे पाच संगीतिकांचे पुस्तक. |
| १९६० | - | च्या दसऱ्याला त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडून ''महाराष्ट्र कवी'' हा किताब बहाल झाला. |
| एप्रिल१९४९ ते जून १९५० | - | साहित्य परिषदेच्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक. |
| १९५५ ते १९५८ | - | साहित्य परिषदेच्या चिटणीस पदाचा कार्यभार उचलला. |
| १९५८ ते १९६१ | | साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष. |
| १९६१ | - | 'मुठे लोकमाते' हे पानशेतच्या धरण फुटीवरचे प्रासंगिक काव्य. |
| १९६२ | - | 'कमण्डलू' हा कवितासंग्रह. |
| १९६८ | - | 'छत्रपती शिवराय' हे ५२१ पृष्ठांचे काव्य. |
| १९६९ | - | भारत सरकारने पद्मभूषण हा किताब दिला. |
| १९७७ | - | ''रणदुर्गा झाशीवाली'' हे काव्य. |
| २६ नोव्हेंबर १९८५ | - | निधन. |